महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-९ अंक-१ डिसेंबर-जानेवारी -२०१५

**Dear Colleague,**

Thank you for warm welcome given to me. My best wishes to you for the New Year. I look forward your continued co-operation in our endeavors for building capabilities of our organization.

Transmission has a pivotal role in entire supply chain of power sector. It is rightly termed as the Vital Link between Generation and Distribution.

In management of transmission network our key focus is Operations and Maintenance of EHV Sub-stations and lines. In chronology our work commences with planning i.r.o how many different capacity EHV Sub-stations and lines are to be erected in the year, which is obtained from STU, it is then converted in to Projects and once the projects hands over after commissioning it then perpetually operated and Maintained. During these stages, services of other allied engineering disciplines such as Testing, Civil, CPA, ERP/IT are involved. The Government made functions of MSETCL multifold and entrusted additional responsibility as State's Transmission Utility and State Load Dispatch Centre. Further we have diversified into tele-communication segment. The HR & F&A are enablers; HR has to facilitate welfare and alignment of employees with organization vision, mission and objectives whereas Finance & Accounts (F&A) has to ensure checks and control on organization system and processes with an aim of maintaining financial discipline.

Uptill now our performance and financial results are encouraging. We have to sustain our good results and it is possible by continuous improvements in our system and processes. We can not afford to be complacent and must strive to achieve higher standard of operational excellence.

Automation such as SCADA, ABT Metering, ERP need to be built in the system and leverage from it. Timely completion of projects and avoiding time and cost overrun will be priority. Streamlining Hot Line and Predictive Maintenance Practices will be thrust area. Reducing interruptions in number of occurrences and its duration and thereby increasing system availability will also be the priority. Zero accident, Inventory Control, Just in Time supply of spares be ensured. Financial discipline and capacity and skill development of employees will be achieved.



Power sector is under transition stage. Electricity is now being considered from mere welfare good to commodity. It is now traded and being made competitive. Therefore huge investment is flowing in Power sector to leverage from its growth estimate. In Maharashtra the scenario of power demand and supply has improved over the period of time. Multi-agency initiatives such as Niti Ayog, Electricity Tariff Policy, Electricity Act, Regulating bodies, Reform measures, CEA, etc. have contributed in the progress. Our HVAC system availability increased from 99.29% in the year 2008-2009 to 99.72% in the year 2013-2014, which is above the MERC benchmark of 98%. We have succeeded in bringing down our transmission losses from 4.88% in the year 2008-2009 to 4.08% in the year 2013-2014. I am sure with our continued efforts we will succeed in further bringing down our transmission losses.

Now, to overcome this gap, it is required to stretch our imagination and challenge our belief to facilitate further value addition and value engineering beyond system optimum level. For this we may have to do radical thinking and use various methods such as Business Process Re-engineering, Kaizen and TQM.

While making attempt of scaling higher performance standards we must ensure our mission of providing uninterrupted, reliable and affordable power to all and there is no compromise to the mission.

I shall expect my associates to be duty bound and pro-active. There should not be laxity and lethargy in the system. They should be part of solution and not mere highlighting their problem. Going with our vision, I look forward your contribution in making MSETCL a model Electricity Transmission Company.

**With best wishes!**

**Rajiv Kumar Mital**
**Chairman and Managing Director**

## मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची नाशिक परिमंडळात भेट



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, मा.श्री.राजीव कुमार मितल यांनी दिनांक २९.०१.२०१५ रोजी अति उच्च दाब बांधकाम नि. संवसु परिमंडळ, नाशिक या कार्यालयास भेट दिली. यावेळी मा.मुख्य अभियंता, श्री.बी.टी. राऊत यांनी अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वागत केले.

हया प्रसंगी श्री.मितल यांनी दैनंदिन कामाचा आढावा घेतला. तसेच परिमंडळातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी जोमाने कामे करण्यासंदर्भात सुचना दिल्या.

यावेळी त्यांच्या सोबत मा.ओ.के. एम्पाल, संचालक (संचलन) श्री.आर.डी. चव्हाण, मुख्य अभियंता, सांघिक कार्यालय, मुंबई हे उपस्थित होते. तसेच परिमंडळ कार्यालयातील मुख्य अभियंता, श्री.बी.टी. राऊत, अधीक्षक अभियंता, श्री.एस.पी. वसेकर, श्री.एम. एल. गुट्टे, श्री.एम.आर. भगत, श्री.आर.एस. कांबळे तसेच श्री. प्रशांत चौधरी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) व श्री.मिलींद घोलप, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), श्री.एस.एस. नवलाखे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांच्यासह परिमंडळ कार्यालयातील अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कार्यकारी संचालक (मासं) यांची औरंगाबाद परिमंडळास भेट



अउदा बांधकाम नि.संवसु परिमंडळ, औरंगाबाद या कार्यालयाची दिनांक १५.१२.२०१४ रोजीची आढावा बैठक मा.श्री.एस.आर. वाघमारे, कार्यकारी संचालक (मासं), श्री.अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांच्या उपस्थित झाली.

या आढावा बैठकीची सुरुवात मा.श्री.रोहिदास मस्के, मुख्य अभियंता, परिमंडळ औरंगाबाद यांनी मा.श्री.एस.आर. वाघमारे, कार्यकारी संचालक (मासं) सांघिक कार्यालय, मुंबई यांचे स्वागत केले. सदर बैठकीत श्री.नितीन कांबळे, सहा. महाव्यवस्थापक (मासं) यांनी मानव संसाधन विभागाची तसेच श्री. विवेक कानडे, कार्यकारी अभियंता, अउदा बांधकाम नि.संवसु परिमंडळ, औरंगाबाद यांनी परिमंडळ कार्यालयातील तांत्रिक विभागाची माहिती सादर केली.

कार्यकारी संचालकांनी मानव संसाधन विभागाचे कार्य तसेच प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राच्या कामाचा आढावा घेतला तसेच त्यांनी ४०० केव्ही थापटी तांडा उपकेंद्रास भेट देऊन तेथील कामाची पाहणी केली.

## अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, यांची म.रा.भा.प्रेषण केंद्र, ऐरोली येथे भेट



मा.श्री.राजीव कुमार मितल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी यांनी दि. १६.०१.२०१५ रोजी म.रा.भा.प्रे. केंद्र, ऐरोली येथे सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी भार प्रेषण केंद्रातील मुख्य अभियंता, श्री.जयंत विके यांनी त्यांचे स्वागत केले. सदर बैठकीत श्री.वसंत पांडे, अधीक्षक अभियंता यांनी राज्याची विद्युत प्रणाली, भार प्रेषण केंद्राची कामे व जबाबदाऱ्या विस्तृत सादरीकरण केले.



सादरीकरणानंतर श्री.मितल यांनी भार प्रेषण केंद्रातील नियंत्रण कक्षास भेट दिली. यावेळी श्री.दिपक रोकडे, अधीक्षक अभियंता (संचलन) यांनी नियंत्रण कक्षाच्या व श्री.जयंत कुलकर्णी, अधीक्षक अभियंता (ऊर्जा अंकेक्षण), यांनी ऊर्जा अंकेक्षण व ओपन ॲक्सेसच्या कामकाजविषयी विस्तृत माहिती सादर केली. सदर प्रसंगी श्री.ओ.के. एम्पाल, संचालक (संचलन), श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन), डॉ.संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता (एस.टी.यु.), मुंबई, श्री.सतिश गहिरवार, अधीक्षक अभियंता, वाशी, श्री.रविंद्र सातपुते, अधीक्षक अभियंता (टीसीसी मंडल) वाशी, श्री.एस.बी. स्वामी, अधीक्षक अभियंता (प्रशासन-मा.तं.), सौ.स्वाती यंबल, सहा. महा व्यवस्थापक (वित्त व लेखा) व इतर सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## नागपुर परिमंळातर्फे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला





अउदा बां. नि.संवसु परिमंडळ कार्यालय नागपुर येथे सोमवार दि. २६.०१.२०१५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रभारी मुख्य अभियंता, श्री.ए.एम. कोडांवर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तसेच, ध्वजवंदनाच्या कार्यक्रमानंतर प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन ''दादाभाई सभागृह'' प्रकाश भवन महावितरण, गड्डीगोदाम नागपुर येथील परिमंडळ अंतर्गत नागपुर जिल्हातील महापारेषण कंपनीतील सर्व कर्मचारी व अधिकारी यांच्या करिता सकाळी ९.०० वा. ''जीवन ज्योती ब्लड बँक'' मार्फत रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीराचे, ''हृदय विकार कसे टाळावे'' या विषयावर डॉ. समीर पाठक, व्होकार्ट रुग्णालय, नागपुर यांचे व्याख्यान व श्री. खडसे यांनी ''कामाची संस्कृती'' (Work Culture) या विषयावर मार्गदर्शन केले. तद्नंतर ४०० केव्ही उ.कें. संवसु चंद्रपुर येथे अत्यंत महत्वाचे असे "String Replacement" चे महत्वपुर्ण काम यशस्वी करणाऱ्या हॉट लाईन युनिट नागपुर येथील कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुस्तकरुपी पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच दरवर्षी प्रमाणे गुणवंत प्राप्त कर्मचाऱ्यांच्या मुलांना शिष्यवृत्तीच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले व अपघात विरहीत सेवा देणारे वाहन चालक श्री.रेड्डी यांचा सुध्दा धनादेश देऊन सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता श्री.ए.एस. कोंडावार प्रभारी मुख्य अभियंता व श्री.अभय रोही, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं), यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ कार्यालयातील उपव्यवस्थापक (मासं), श्री.राजेश कुंभरे, श्री.प्रल्हाद रामटेके व कार्यालयीन सहाय्यक श्री.संजय भड, प्रविण भालेराव व श्री.शेट्टी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सांघिक कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा



भारताचा ६६वा प्रजासत्ताक दिन २६ जानेवारी २०१५ रोजी सकाळी १० वा. मुख्य कार्यालय, मुंबई येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

मा. श्री. राजीव कुमार मितल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण कंपनी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी इतर संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पुणे परिमंडळ अंतर्गत "Know your Sub-Station"



अउदा बां.नि.संवसु परिमंडल, पुणे अंतर्गत "Know your Sub-Station" हा वेगळा प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आला. उपकेंद्रातील कामाचे स्वरूप ज्यामध्ये उपकेंद्रावर एकुण आत येणारा विजेचा भार, त्या विजेच्या भाराचे योग्य प्रमाणात विभाजन करून त्या भाराचे ईतरत्र जाणारे फिडर नुसार विजेचे व्यवस्थापन हे उपकेंद्रातील विविध उपकरणाद्वारे नियंत्रण कशा प्रकारे केले जाते. याची माहिती प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रात देण्याऐवजी ठराविक उपकेंद्रात त्याचे प्रात्यक्षिकासह माहिती या प्रशिक्षणामध्ये अंतर्भुत करण्यात आली असून प्रारंभी Pune Ring Main मधील संवेदनशील असलेल्या २२० केव्ही फुरसुंगी उपकेंद्रात यावेळी प्रायोगिक तत्वावर दि. ०७.११.२०१४ रोजी उपकेंद्र प्रमुख, अभियंते, ऑपरेटर्स यांना एकत्र आणुन मुख्य अभियंता, श्री.पी.आर. देवरे यांच्या हस्ते उद्घाटन करून प्रशिक्षणास सुरुवात करण्यात आली. उपकेंद्रातील Load Flow] Scada, Disaster Management, Wave Trap, Control Panel, Battery Room व यार्डातील उपकरणे, Transformers, Isolators, Insulators, Circuit Breakers यांची कार्यप्रणाली उपस्थितांना अवगत करून देण्यात आली.

सदर प्रायोगिक प्रशिक्षणास श्री.संजीव भोळे, कु.विजया मुखेडकर- अधीक्षक अभियंते, श्री.महेंद्र काटेंगे, श्री.राजीव देव, कार्यकारी अभियंते, श्री.चित्रे, श्री.पाटील - अतिरिक्त कार्यकारी अभियंते व इतर अभियंते, वाहिनी कर्मचारी उपस्थित होते.

सदर प्रशिक्षणाचे संकल्पना व संचलन श्री.अशोक देशपांडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, जेजुरी प्रशिक्षण केंद्र यांनी यांच्या कंपनीच्या कामाच्या पूर्वानुभवावरून साकारली असून अशाप्रकारचे प्रशिक्षण महाराष्ट्रातील इतर उपकेंद्रातून सुध्दा केले जाणार आहे.

## महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन आदरांजली कार्यक्रम



दि. ३०.०१.२०१५ रोजी प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे येथे सकाळी ११.०० वाजता महापारेषण व महावितरण कंपनी तर्फे संयुक्तरित्या महात्मा गांधी यांची पुण्यतिथी व हुतात्मा दिनी आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम पार पडला.

## अमरावती परिमंडळातील आंतर मंडळातील पार पडलेल्या नाट्यस्पर्धेबाबत




महापारेषण कंपनीच्या अमरावती परिमंळातील आंतर मंडलीय नाट्य स्पर्धा वर्ष २०१४-१५ हे दिनांक ०९.१२.२०१४ व दि. १०.१२.२०१४ रोजी घेण्यात आल्या. या स्पर्धेत अमरावती परिमंडळातील चार मंडळ कार्यालयाने खालीलप्रमाणे नाटक सादर केले.

| | | |
|---|---|---|
| १. | परिमंडळ कार्यालय व चाचणी व दुरसंचार मंडळ, अमरावती | - वाट्टेल ते प्रेमासाठी |
| २. | अउदा संवसु मंडळ, अमरावती | - काही सावल्यांचा खेळ |
| ३. | अउदा बांधकाम मंडळ, अमरावती | - आव्हान |
| ४. | अउदा स्थापत्य मंडळ, अमरावती | - मला काही आठवत नाही |

ह्या नाट्यस्पर्धेचे अध्यक्षपद मा.श्री.एस.जे. पाटील, मुख्य अभियंता, अमरावती परिमंडळ यांनी व कार्यध्यक्ष पद श्री.व्हि.डी. मेंढे, अधीक्षक अभियंता, अउदा बांधकाम मंडळ, अमरावती यांनी भुषविले, या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.श्री.एम.टी. देशमुख, अध्यक्ष, कलारंजन मंडळ, श्री.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, श्रीमती प्रभा गणोरकर, प्रसिध्द साहित्यीका हे लाभले. उपाध्यक्ष म्हणून श्री.यशवंत गजभिये, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, अमरावती, श्री.राजेंद्र तिजारे, अधीक्षक अभियंता, चाचणी व दुरसंचार मंडळ, अकोला, समन्वयक श्री.हीरामण पी.राठोड, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं), कोषाध्यक्ष श्री.विजय ठाकरे, प्रभारी सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले), अमरावती परिमंडळ, सचिव श्री.जयंत वाघमारे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अउदा बांधकाम विभाग, अमरावती यांचा विशेष सहभाग लाभला.

अउदा बांधकाम मंडळ, अमरावती कार्यालयाने सादर केलेले 'आव्हान' नाटकांस प्रथम पारितोषिक मिळाले. हया नाट्यस्पर्धेसाठी लाभलेल्या परिक्षक श्री.राजाभाऊ मोरे, ज्येष्ठ रंगकर्मी, श्रीमती आशाताई देशमुख, ॲड. श्री. प्रदीप प्रेमलवार व आयोजन समितीच्या अथक परिश्रमाने हया आतर मंडलीय नाट्यस्पर्धा खेळी-मेळीच्या वातावरणात पार पडल्या.

स्पर्धा यशस्वीरित्या आयोजनाकरिता श्री.एस.जे. पाटील, मुख्य अभियंता व श्री.वं.दा. मेढे, अधीक्षक अभियंता यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री.जयंत वाघमारे, श्री.दिनेश धुमाळे, सौ.प्रणोती देशमुख, अतिरिक्त कार्यकारी अभियंता व आभार प्रदर्शन श्री.अनंत अभ्यंकर, उच्चस्तर लिपीक (मासं) यांनी केले.

## मुख्य सुरक्षा अधिकारी यांची प्रमुख भांडार 'क' बारामती कार्यालयात भेट



महापारेषण कंपनी, सांघिक कार्यालयाचे मुख्य सुरक्षा अधिकारी श्री.संजय कुमार यांनी दिनांक ०६.१२.२०१४ रोजी अउदा परिमंडल, पुणे अंतर्गत प्रमुख भांडार 'क' बारामती येथे भेट दिली.

त्यावेळी त्यांनी भांडाराच्या सुरक्षेचा आढावा घेतला. तसेच सर्वेलंस कॅमेरा सिस्टिम, वॉटर हायड्रंट, हायमास्ट टॉवर्स या सुरक्षा प्रणालींचे अवलोकन करून भांडार कक्षाच्या विविध भागास भेट देवून तेथील साहित्य रचनेबाबत कौतुक व्यक्त केले.

बारामती भांडारात कार्यरत असलेल्या पहारेकरी व सुरक्षारक्षक यांना श्री.संजय कुमार यांनी मार्गदर्शन करून आपल्या कंपनीच्या मौल्यवान साहित्य, उपकरणांची निगराणी करण्याबाबत मौलिक मार्गदर्शन केले.

श्री.शशिकांत बाकरे, कार्यकारी अभियंता (भांडार) श्री.अनिल माळी, उपकार्यकारी अभियंता (भांडार) व श्री.राजेश गोवळकर, उपमुख्य सुरक्षा अधिकारी, पुणे परिमंडळ यांनी श्री.संजय कुमार, मुख्य सुरक्षा अधिकारी यांचे स्वागत केले.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकारी यांची नियुक्ती /निवृत्ती माहे डिसेंबर-२०१४ ते जानेवारी-२०१५

**नियुक्ती:**

| अ.क्र | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| निरंक | | | | |

**निवृत्ती:**

| अ.क्र | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.धनवटे अविनाश हरिचंद्र | अधीक्षक अभियंता (पारेषण) | पारेषण, प्रकल्प, मु.का., मुंबई | ३१.०१.२०१५ |

## आंतर मंडलीय नाट्य स्पर्धेत अउदा संवसु मंडल, पुणे यांनी सादर केलेल्या ''कमला'' नाटकास प्रथम क्रमांक



अउदा बा.निसंवसु परिमंडल, पुणे तर्फे श्री.प्रभाकर देवरे, मुख्य अभियंता तथा अध्यक्ष आणि श्रीमती विजया मुखेडकर, अधीक्षक अभियंता तथा कार्याध्यक्ष नाट्य स्पर्धा समिती यांचे देखरेखीखाली महापारेषण कंपनीच्या द्विवार्षिक आंतर मंडलीय नाट्य स्पर्धा २०१४-१५ भरत नाट्य मंदिर, पुणे येथे दि. १२.०१.२०१४ ते १४.०१.२०१५ या कालावधीत पार पडल्या. सांघिक कार्यालयातर्फे श्री.अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. आंतर मंडलीय नाट्य स्पर्धेचे उद्घाटन श्री.निळकंठ वाडेकर, मुख्य अभियंता-महावितरण, पुणे परिमंडल यांचे हस्ते करण्यात आले.

अउदा संवसु मंडल, पुणे कार्यालयाच्या कलाकार कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या श्री.विजय तेंडुलकर लिखित ''कमला'' नाटकास प्रथम क्रमांक मिळाला. श्री.अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, श्री.प्रभाकर देवरे, मुख्य अभियंता अउदा पुणे परिमंडल व श्री.निळकंठ वाडेकर, मुख्य अभियंता -महावितरण, पुणे यांचे हस्ते अउदा संवसु मंडल, पुणे कलावंताना विजयी चषक व प्रशस्तीपत्र देण्यात आले. नाटकाचे दिग्दर्शन श्री.भिमाशंकर पोहेकर यांनी केले.

(१) लेखक सई परांजपे लिखित व श्री.प्रशांत पटवारी यांनी दिग्दर्शित ''माझा खेळ मांडु दे'' (२) श्री.विजय तेंडुलकर लिखित व श्री.भुषण साळुंखे यांनी दिग्दर्शित ''नियतिच्या बैलाला'' (३) श्री.विजय तेंडुलकर लिखित व श्री.भिमाशंकर पोहेकर यांनी दिग्दर्शित ''कमला'' (४) श्री.चंप्र.देशपांडे लिखित व श्री.वसंत गद्रे यांनी दिग्दर्शित ''सामसुम'' अनुक्रमे अउदा संवसु मंडल, सोलापूर/चाचणी व संचारण मंडल, पुणे/ अउदा संवसु मंडल, पुणे/अउदा बांधकाम व स्थापत्य मंडल, पुणे (संयुक्तिक) या कार्यालयातर्फे अशी एकुण ४ नाटके सादर करण्यात आली.

नाट्य क्षेत्रातील प्रसिध्द असलेले नामवंत रश्मिता शहापूरकर, श्री.नंदू पोळ, श्री.दिलिप जोगळेकर यांनी नाटकाच्या परिक्षकाचे काम पाहिले.

नाटकाचे सर्वांगिण निकालामध्ये खालील कलाकार कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| अभिनेता | प्रथम क्रमांक | श्री.शाम सावंत | ''कमला'' |
| | द्वितीय क्रमांक | श्री.सुनिल दत्त कुलकर्णी | ''नियतिच्या बैलाला'' |
| अभिनेत्री | प्रथम क्रमांक | सौ.वर्षा बोरकर | ''कमला'' |
| | द्वितीय क्रमांक | पियुषा जोगल | ''कमला'' |
| दिग्दर्शक | प्रथम क्रमांक | भिमाशंकर पोहेकर | ''कमला'' |
| | द्वितीय क्रमांक | भुषण साळुंखे | ''नियतिच्या बैलाला'' |
| नेपथ्य | प्रथम क्रमांक | सुनिल घाडगे/ सचिन कडलग | ''कमला'' |
| संगीत | प्रथम क्रमांक | -- | ''नियतिच्या बैलाला'' |
| | द्वितीय क्रमांक | -- | ''माझा खेळ मांडु दे'' |
| प्रकाश योजना | प्रथम क्रमांक | दिपक कोकणे/ भगवान गायकवाड | ''कमला'' |
| | द्वितीय क्रमांक | -- | ''माझा खेळ मांडु दे'' |
| रंगभुषा/वेशभुषा | प्रथम क्रमांक | -- | ''नियतिच्या बैलाला'' |
| | द्वितीय क्रमांक | -- | ''सामसुम'' |
| लक्ष्यवेधी भुमिका | -- | कस्तुरी पुजारी | ''माझा खेळ मांडु दे'' |
| | | मुकूंद पवार | ''नियतिच्या बैलाला'' |
| | | श्री.श्रीधर अडके | ''कमला'' |
| | | दिपाली लाटे | ''सामसुमल'' |

स्पर्धेचे आयोजन अउदा संवसु मंडल, पुणे यांनी केले. समारंभाच्या आभार प्रदर्शनाचे काम श्री.राजीव देव, कार्यकारी अभियंता यांनी तर कार्यक्रमांचे सुत्रसंचालनाचे काम श्री.मुकूंदराज कुलकर्णी यांनी केले.

## तेजस्विनी Women Empowerment Training ''महिला शक्ती प्रदान प्रशिक्षण''

असे प्रशिक्षण जे महिलांचा आत्मविश्वास वाढविते, आपल्यातील उणीवांचे सामर्थ्यात रुपांतर करायला शिकविले, दैनंदिन जीवनात-घरच्या व कार्यालयीन पातळीवर येणाऱ्या समस्यांवर मात करून पुढे जायला शिकविते, व्यक्तिमत्व फुलविणे, आनंदी राहणे, स्वतःच्या भावनांवर ताबा मिळवून येणाऱ्या प्रसंगाशी मुकाबला करणे इ.बाबींचा परामर्श घेतल्याने निर्भयतेतून येणाऱ्या सामर्थ्याची अनुभूती येते.

''निर्भयतेतून सामर्थ्याकडे नेणारे प्रशिक्षण''

''महिलांच्या जीवनात तेजस्विता आणणारे प्रशिक्षण''

''काळाची गरज असलेले महिलांसाठीचे प्रशिक्षण''

प्रशिक्षणाची प्रभावी कल्पना, सुटसूटीत मांडणी, मनोरंजक व बुध्दीला चालना देणारे खेळ, निसर्ग सानिध्यात वसलेले प्रशिक्षण केंद्र, तत्पन कर्मचारी / अधिकारी वर्ग, सात्विक आहार तसेच आल्यातील उणीवांवर मात करून त्यांचे सामर्थ्यात रुपांतर करून दाखवणाऱ्या चित्रफिती, ऐतिहासिक शूर विरांगणा - जिजामाता व शैक्षणिक क्षेत्रात ज्योतीप्रमाणे तेवत राहणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावरील चित्रफिती / माहिती इत्यादीची जोड दिल्याने हे प्रशिक्षण अतिशय प्रभावी झाले आहे.

**-श्रीमती श्रध्दा गंद्रे, व्यवस्थापक**

**मुख्य सांघिक कार्यालय मुंबई**

## औरंगाबाद परिमंडळानी सादर केलेल्या नाट्यस्पर्धेचा आढावा



अउदा बांधकाम नि. संवसु परिमंडळ, औरंगाबाद तर्फे दिनांक २९ व ३० डिसेंबर २०१४ राजी नाट्यस्पर्धा घेण्यात आल्या.

सदरील नाट्यस्पर्धेचे उद्घाटन मा.श्री. शंकर शिंदे, मुख्य अभियंता, महावितरण, औरंगाबाद यांचे हस्ते झाले व मा.श्री. रोहिदास मस्के, महापारेषण, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली अभियंता (स्था) मंडल कार्यालय, औरंगाबाद यांनी प्रास्ताविक रुपाने या मागची कंपनीची भुमीका मांडली व तसेच संबंधीत नाट्यस्पर्धेची नियमावली सांगितली.

संबंधीत नाट्यस्पर्धेतून एकूण ५ नाटक आयोजित करण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | उसनी बायको पाहिजे | - | अउदा संवसु परिमंडळ, औरंगाबाद |
| २) | स्मशानातील कुत्रे | - | अउदा बांधकाम नि संवसु परिमंडळ व अउदा स्थापत्य बांधकाम नि. सुव्यवस्था मंडल, औरंगाबाद |
| ३) | रात मत्रा | - | चाचणी व दुरसंचार मंडल, औरंगाबाद |
| ४) | शापित | - | अउदा बांधकाम मंडल, औरंगाबाद |
| ५) | फंदी | - | अउदा संवसु मंडल, परळी बैजनाथ |

दिनांक ३० डिसेंबर २०१४ रोजी रात्री ८.०० ते १०.०० वाजे पर्यंत पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

सदरील नाटकांचे सादरीकरण प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे होते. व व्यावसायिक नाट्यभूमीच्या बरोबरीचे होते. सदरील नाटकांमधून वेगवेगळे विषय हाताळण्यात आले व त्यांचे उत्कृष्ट सादरीकरण प्रेक्षकांसमोर करण्यात आले. या नाट्यस्पर्धेचा आनंद अधिकारी/कर्मचाऱ्या सोबत त्यांच्या कुटुंबीयांनी देखील घेतला.

दिनांक ३० डिसेंबर २०१४ रोजी सायंकाळी या नाट्यस्पर्धाचे पारितोषिक वितरण करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन) यांनी भुषविले तर सदरील कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्री.ओ.के. एम्पाल, संचालक (संचलन-प्रकल्प) हे उपस्थित होते, यात अउदा बांधकाम मंडल, औरंगाबाद या मंडलाचे ''शापित'' या नाटकास प्रथम पारितोषिक देण्यात आले.

हया पारितोषिक वितरणासोबतच परिमंडळांतर्गत Reward केम्पस मधील विजेत्यांना पारितोषिक देऊन त्यांचा देखील गौरव करण्यात आला.

या दोन्ही कार्यक्रमास मंडल कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री.नसीर कादरी, शशांक जवळीकर, अरुण वाघमारे, भुषण बल्लाळ व फरकाडे साहेब व तसेच मानव संसाधन विभागाचे प्रमुख श्री.नितीन कांबळे, सहा. महाव्यवस्थापक (मासं) श्री.विवेक कानडे, कार्यकारी अभियंता व सर्व विभागीय कार्यालयाचे प्रमुख कार्यकारी अभियंते व कर्मचारी उपस्थित होते. या दोन्ही कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ.मंजुषा दुसाने यांनी केले.

या नाट्यस्पर्धेचे आयोजन व नियोजनात नाट्यस्पर्धा आयोजन समिती बरोबरच इतरानींही सहभाग घेऊन सदरील नाट्यस्पर्धा उत्साहात पार पाडल्या.





## आकांक्षा चौहान अमेरिकेला रवाना

महापारेषणच्या नागपूर येथील स्थापत्य मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.मोतीसिंह चौहान यांची कन्या कु.आकांक्षा चौहा ही नुकतीच अमेरिकेला रवाना झाली. कु.आकांक्षा हिची न्यूयार्क विद्यापीठाने एम.एस. (मेकॅनिकल डिझाईन) या पद्व्यूत्तर अभ्यासक्रमासाठी निवड केली असून दोन वर्षाच्या या अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातर्फे तिला शिष्यवृत्ती मिळाली आहे.

कु.आकांक्षाने माटुंगा, मुंबई येथील व्हीजेटीआय या अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. पूर्ण केले आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि शिक्षकांना दिले आहे.



## अभिजीत गिरमल अमेरिकेला रवाना

अति उच्च दाब पारेषण वाहिनी बांधकाम उपविभाग, सांगली चे उपकार्यकारी अभियंता श्री.ए.एन.गिरमल यांचा मुलगा अभिजीत यांस अमेरिकेतील डेट्रॉईट (मिशीगन राज्य) येथील वेन स्टेट युनिव्हर्सिटी मध्ये इंडस्ट्रियल मॅनेजमेंट मध्ये एम.एस. करणेसाठी प्रवेश मिळाल्याने तो दि. ०५.०८.२०१४ रोजी अमेरिकेस रवाना झाला. याबद्दल त्याचे महापारेषण व अति उच्च दाब बांधकाम विभाग, सांगली तर्फे हार्दिक अभिनंदन!

## विना अपघात सेवा केल्याबद्दल वाहन चालकांचा सत्कार



श्री. पोपट एकनाथ बावळे, वाहन चालक, अउदा बां.नि. संवसु परिमंडल, पुणे यांचा २० वर्षे विना अपघात केल्याबद्दल रु. ५०००/- पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव.

महापारेषण परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!



श्री.अनिल शामराव जोशी, वाहन चालक, अउदा बां.नि. संवसु परिमंडल, पुणे यांचा १० वर्षे विना अपघात केल्याबद्दल रु. २५००/- पारितोषिक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव.

महापारेषण परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!



## सरळ सेवा नियुक्ति

नागपूर परिमंडळांतर्गत श्री.सदानंद हुसनजी राजेश्वर (रामटेके) वरिष्ठ यंत्रचालक या पदावर ग्रहण केंद्र रिंगमेन विभाग, नागपूर येथे कार्यरत असून पूर्वीचे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात दिनांक ०३.०१.१९८९ रोजी कनिष्ठ यंत्रचालक या पदावर रुजू झालेत मंडळात कार्यरत असतांना त्यांनी वेळोवेळी पदोन्नती घेत वरिष्ठ यंत्रचालक या पदावर दिनांक ०१.१०.२००९ रुजू झालेत वरिष्ठ यंत्रचालक या पदावर कार्यरत असताना कंपनीच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा व्यत्यय न आणता त्यांनी जे.आर.एन. राजस्थान विद्यापीठ, राजस्थान येथून इलेक्ट्रीकल हा विषय घेऊन त्यांनी बि.टेक हा अभ्यासक्रम पूर्ण करून त्यात सुयश संपादन केले आहे.

पारेषण कंपनीतर्फे झालेल्या सरळसेवा भरतीमध्ये त्याचे उपकार्यकारी अभियंता (पूर्वीचे सहाय्यक अभियंता) या पदाकरीता त्याची निवड करण्यात आली. श्री.सदानंद हुसनजी राजेश्वर (रामटेके) याचे यशाबद्दल नागपूर परिमंडळातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

त्यांना पुढील वाटचालीकरीता मनपूर्वक शुभेच्छा!

## मुख्य अभियंता, मानव संसाधन विकास यांचा संदेश



माझ्या कर्मचारी बंधु आणि भगिनींनो,

महापारेषण कंपनीने मानव संसाधनच्या वाढीस अनुकूल अश्या अनेक योजना अंमलात आणल्या आहेत. मुख्य अभियंता (मानव संसाधन विकास) म्हणून मला मानव संसाधन विकासात सर्वात महत्वाची बाब म्हणजे कर्मचाऱ्यांचे वेतन, सुविधा आणि पदोन्नती वेळेत व नियमानुसार कर्मचाऱ्यास प्राप्त करून देणे. तसेच नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या कार्यप्रणाली मध्ये सतत सुधारणा करणे व कर्मचाऱ्याचे विचार जाणून घेवून त्याप्रमाणे आपल्या कार्यपध्दतीत बदल करणे हा आहे. त्यानंतरच इतर मनुष्यबळ विकासात्मक कार्यक्रम उपयोगी ठरू शकतात. आज ERP प्रणालीमुळे आपल्याला मिळण्यात येणारे वेतन वेळेत आपल्या खात्यात जमा होते. आता या पुढे जावून TA/DA सुध्दा खात्यात जमा होण्याकरीता प्रणाली सज्ज होत आहे. सरळसेवा भरती व पदोन्नती भरती वेळेत करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहे. तसेच कर्मचाऱ्यांचे त्यांच्या कामानुरूप कामगीरीचे मुल्यांकन व्हावे म्हणून नविन कार्यमुल्यांकन पध्दत अमलात आणली गेली आहे. हया नवीन पध्दतीचे ज्ञान सर्वांना व्हावे म्हणून परिमंडळ पातळीवर मानव संसाधन विकास विभागातर्फे कार्यशाळा व खुल्या सभेचे आयोजन करण्यात आले.

उचीत प्रशिक्षण व कामाच्या अनुभवामुळे आपल्याला नवीन पीढी घडवीता येते व तसा कार्यक्रम आपल्या संस्थेमध्ये राबवीला जात आहे. वाहन चालका पासून ते मुख्य-अभियंता यांस क्षमता वाढीस लागणारे प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षण देताना होणारा खर्च हा गुंतवणूक आहे अशी मानव संसाधन विकास विभागाने धारणा प्रस्थापीत केलेली आहे. हा विचार समोर ठेवून भारत सरकारच्या राष्ट्रीय प्रशिक्षण धोरणानुसार सर्व कर्मचाऱ्यांना वर्षातून किमान सात दिवस प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्याकरीता कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या एकूण खर्चाच्या १.५ टक्के रक्कम प्रशिक्षणा करिता नियोजीत करण्यात आली आहे.

माझे सर्वांना आवाहन आहे की आपल्या संस्थेला प्रगतीपथावर नेण्याच्या सर्वात मोठी जबाबदारी भाग मानव संसाधनाची आहे. मानव संसाधन विभागात कार्य करणारा कर्मचारी इतर सर्व कर्मचारी त्यांचे जवळचे मित्र आहेत अशी भावना ठेवून सर्वांना चांगली सेवा देण्याकरिता कटीबध्द असले पाहिजे. व्यवस्थापनाने दिलेल्या प्रत्येक संधीचा उपयोग करून आपल्या कामाची गुणवत्ता वाढवता आली पाहिजे. वरीष्ठांनी सोपवलेली जबाबदारी मनापासून पार पाडली पाहिजे. संस्था आपल्या गरजा भागवत असते त्यामुळे संस्थेशी आपण एकनिष्ठ व प्रामाणिक असणे गरजेचे आहे. स्पर्धात्मक युगात आपल्याला अनेक आव्हांनाना सामोरे जावे लागणार आहे. आतापर्यंत आपली कामगिरी सकारात्मक आहे. परंतु येणारा काळ स्थिर नाही त्यामुळे आपल्याला सुध्दा दक्ष राहून काळानुरूप आपल्या कार्यपध्दतीमधे बदल करावे लागणार आहे. आपल्यामधे लवचिकता आणने, नवे तंत्रज्ञान अंगीकृत करणे व इतरत्र चालणाऱ्या आदर्श प्रणाली/पध्दती आपल्या संस्थेमध्ये राबविणे ही गरज आहे.

मला आशा आहे आपण सर्व आपल्या संस्थेचा गौरव कायम राखण्यात व वाढीस नेण्यात व्यवस्थापनास सहकार्य कराल. मानव संसाधनविषयाशी निगडीत कोणताही शंका किंवा सुचना असल्यास कृपया मला ***cehrd@mahatranco.in*** किंवा ***ceir@mahatransco.in*** या इमेल वर संपर्क साधावा.

**-श्री.संजय तु. शिंदे**
**मुख्य अभियंता (मानव संसाधन विकास)**
**सांघिक कार्यालय,मुंबई**

## अन्नदाता सुखी भवः

रोटी, कपड़ा, मकान, औषधे व शिक्षण हया आपल्या मुलभूत गरजा भागवण्याचे श्रेय आपल्या संस्थेला जाते. समाजामध्ये मान आपल्याला मिळतो, किंबहुना आपली ओळख आपल्या संस्थेमुळे समाजात पडते.

त्यामुळे आपणही संस्थेला ''जिवेत शरद शतम्'' म्हटल पाहीजे. संस्था चिरायु होवुन सतत तिचा गौरव वाढवीणे आपले कर्तव्य आहे.

संस्थे बद्दल आस्था, आदर व सद्‌भावना बाळगणे जरूरीचे आहे. कर्मचाऱ्यांस काही अडचणी असल्यास त्या योग्य स्वरूपात व्यवस्थापनासमोर मांडव्यात व त्या मार्गी लागल्या नाहीत म्हणून मनामध्ये संस्थे बद्दल नाराजी ठेवु नये. संस्थेची एकनिष्टेने सेवा करावी आणि आपल्या उत्पादीकते मध्ये वाढ करावी. आपली वैयक्तीक कामे अथवा अडचणी संस्थेच्या कार्यवेळात करू नये आपला पूर्ण वेळ आणि श्रम आपल्या कार्यासाठी द्यावा.

संस्था स्वत:हून मोठी होत नाही तर त्यास मोठी मोठी करते त्यातील कर्मचारी सस्थेच्या प्रगतीवर कर्मचाऱ्याची प्रगती विसंबुन आहे. संस्था नसेल तर आपल्या मुलभुत गरजा भागवीता येणार नाही याची जाण ठेवणे गरजेचे आहे.

सहकाऱ्यांबरोबर सलोखा ठेवणे, आनंदाने, शांततेन व प्रामाणिकपणे काम करणे त्यामुळे आपण संस्थेच्या विकासाकरीता चांगला हातभार लाऊ शकतो.

आज मी पाहतो जे बेरोजगार आहेत व ज्यांची संस्था आपल्या तुलनेने लहान आहे त्यांना किती कष्टाना सामोरे जावे लागते. आज त्यांच्या तुलनेत आपण कीती सुखी आहोत.

नशीबात आपल्याला अश्या संस्थेत पदार्पण मिळाले आणि आता कष्टाने आपण तिला वाढीस नेवुया

**-श्री.वामन पी. राठोड, व्यवस्थापक (विवले-प्रकल्प)**
**सांघिक कार्यालय, मुंबई**



## नाशिक परिमंडल अंतर्गत आंतर मंडलीय नाट्यस्पर्धा





नाशिक परिमंडळांतर्गत आंतर-मंडलीय नाट्यस्पर्धा सन २०१४-१५ हया दिनांक ०१ व ०२ डिसेंबर २०१४ रोजी महाकबी कालीदास कलामंदीर, नाशिक येथे संपन्न झाल्या. सदर नाट्स्पर्धेचे यजमान पद अधीक्षक अभियंता अउदा संवसु मंडल, नाशिक यांच्याकडे सोपविण्यात आले होते.

तसेच नाट्यस्पर्धाच्या उद्‌घाटन सोहळाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री.सुभाष केळकर, कार्यकारी संचालक (संचलन), तसेच मा.श्री.दिपक करंजीकर, जेष्ठ सिने कलावंत व नाट्य अभिनेते, उपाध्यक्ष, मा.सौ. विद्याताई करंजीकर, जेष्ठ सिने कलावंत व नाट्य अभिनेत्री, मा.श्री.गिरीष ओक, जेष्ठ कलावंत व नाट्य अभिनेते, मा.श्री. एम.यु. कावळे मुख्य अभियंता (स्थापत्य), मा.श्री.बी.टी. राऊत, मुख्य अभियंता नाशिक परिमंडल यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. दि. ०१.१२.२०१४ रोजी श्री.राजकुमार कांबळे, अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल, नाशिक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर मा.श्री. केळकर कार्यकारी संचालक (संचलन), यांनी नाट्यस्पर्धा आयोजन हेतु याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व नाट्यकलावंताना शुभेच्छा दिल्या. मा.श्री. बी.टी. राऊत, मुख्य अभियंता, नाशिक यांनी नाट्यस्पर्धा आयोजन करण्यामागची पार्श्वभुमी कथित केली व कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतुने प्रोत्साहन केले.

सदर नाटयस्पर्धेत एकुण ३ मंडल कार्यालयांनी सहभाग नोंदविला.

१. अउदा बांधकाम मंडळ, नाशिक - ''मी आमदार सौभाग्यवती''
२. अउदा स्थापत्य बांध. मंडळ, नाशिक - ''जाशील तर, कुठे जाशील''
३. अउदा संवसु मंडळ, नाशिक - ''कूसं बलतांना''

दिनांक ०२.१२.२०१४ रोजी पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमास मा.श्री.ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन)/(प्रकल्प), तसेच मा.श्री.सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मासं), मा.श्री.एम.यु. कावळे, मुख्य अभियंता (स्थापत्य), मा.श्री.बी.टी. राऊत, मुख्य अभियंता, नाशिक परिमंडल मा.श्री.अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. हया प्रसंगी मान्यवरांनी सहभागी नाट्यकलावंतांना समायोजित मार्गदर्शन केले.

या नाट्यस्पर्धेत प्रथम पारितोषिक अउदा संवसु मंडल, नाशिक या कार्यालयाने सादर केलेल्या ''कूसं बदलतांना'' हया नाटकास तर द्वितीय पारितोषिक अउदा बांधकाम मंडल, नाशिक यांनी ''मी आमदार सौभाग्यवती'' हया नाटकास मिळाले.

## Personal Effectiveness

"All power is within you; you can do anything and everything" quotes of "Swami Vivekanada". Human are blessed with a body and soul, which has tremendous capabilities. If it is put into use in proper way, we can achieve all happiness in life. I see many people resort to external forces to gain happiness but in true sense we ourselves are capable enough to achieve our means.

Today I see uncalled comparison between now and then. Those with determination to succeed need not to bother about competition, high merit and less opportunity. Taking efforts in right direction will break all barriers and shall make you achieve your goal. It is said that change your thinking, it will change your destiny. It means build up positivity around you and have positive outlook towards life.

While pursuing our goal it is good to have self-awakening time to time. It gives us insight where we are leading and lagging. Accordingly corrective action can be taken. Penchants about reward and recognition are common and many get disturbed if it is not got done. But I see our own certificate about our own contribution is better than any external reward and recognition.

I believe in personal effectiveness is the key to succeed in life. Continuous sharpening our skills is the step in this direction. A concept of general management is very useful in this aspect. Planning, Organizing, Directing and Controlling are required to be built in our upbringing. The best example to this model is our Mother, who in all adversities makes us a good human being. There is so much to learn management from her. Self-discipline, salient working, hard-working are pre-requisite for achievement of goal. A goal is output of the process. Therefore the process is important without it a goal can not be accomplished. Personal effectiveness is not confine to intelligent, in fact it is broad based, i.e. how you get alogwith people, your co-operation and tolerance level, inter-personal skills, people management. This is why there is importance of administration and management. It is not only academic but also ability to connect with people and influencing their mind.

My humble request to all to enhance your personal effectiveness. The quantity and quality of your output will multiply. Nobody is perfect and nothing is permanent. Change is part of life and one has to face it. It is essential to leverage from the changing environment and it is possible if we take efforts in enhancing our personal effectiveness.

With best wishes!!!

**- From the Desk of ED(HR)**

**संपादक : श्री.संदीप सुरवसे, व्यवस्थापक (मा.सं.), प्रभारी जनसंपर्क अधिकारी**
**E-mail : prohr@mahatransco.in**
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.